## .. श्री गणपतिची आरती ..

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाचि
नुरवीपुरवी प्रेम कृपा जयाची
सर्वांगी सुंदर उटि शेंदूराची
कंठी झळके माळ मुक्ता फळाची

जय देव जय देव जय मंगलमुर्ति
दर्शनमात्रे मनकामना पुरती जय देव जय देव ... धृ..

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा
चंदनाची उटी कुंकुम केशरा
हिरेजडित मुगुट शोभतो बरा
रूणझुणती नूपुरे चरणी घागरिया ...१
..जय देव जय देव जय मंगलमुर्ति.....

लंबोदर पीतांबर फणिवर बंधना
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना
दास रामाचा वाट पाहे सदना
संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना ...२
..जय देव जय देव जय मंगलमुर्ति.....